महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

# नियामक मंडळाची ३४ वी बैठक दिनांक ११ जून २००३

मा. ना. अजित पवार, मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) व फलोत्पादन आणि अध्यक्ष (मकृखोविम) यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ३४ वी बैठक दि.११.६.२००३ रोजी पाटबंधारे सभागृह, मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र.३४/१

''ठराव करण्यात येतो की, ३३ व्या बैठकीमध्ये पारित केलेले सर्व ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्रमांक ३४/२

"ठराव करण्यात येतो की, शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या सूचनेप्रमाणे महामंडळाच्या कार्यकक्षेतील बंद असलेल्या कामांपैकी काही कामे हाती घेण्यासाठी, सादर करण्यात आलेल्या व परिशिष्ट क्र.१ मध्ये जोडलेल्या प्राधान्यक्रमास, नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. हा प्राधान्यक्रम शासनास अवगत करण्यात यावा."

ठराव क्र.३४/३

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाच्या कार्यकक्षेतील जलविद्युत प्रकल्पांची कामे खाजगी सहभागातून पूर्ण करण्यासाठी शासनाने विहित केलेली कार्यपद्धतीचा योग्य त्या बदलांसह अवलंब करुन प्रवर्तक निवडीचे व प्रवर्तकांना मान्यता देण्याचे अधिकार मा. अध्यक्षांच्या संमतीने, कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.

२. खाजगी सहभागातून जलविद्युत प्रकल्पांची कामे करण्यासाठी पूर्वअर्हता ठरविताना मुख्य अभियंता (जलविद्युत) यांना सहभागी करुन घ्यावे.''

ठराव क्र.३४/४

''ठराव करण्यात येतो की, ए.आय.बी.पी. अंतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या निधीची शासनाने योजनांतर्गत निधीमध्ये तरतूद न करता स्वतंत्र तरतूद करुन उपलब्ध करुन द्यावा, असा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

(202)

ठराव क्र.३४/५

''ठराव करण्यात येतो की, कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार राज्याच्या वाट्यास आलेल्या पाण्याच्या नियोजनामध्ये समाविष्ट नसलेल्या लघु पाटबंधारे (राज्यस्तर) व उपसा सिंचन योजनासाठी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधीचे धोरण मा. सचिव (पा) व सदस्य तसेच मा. सचिव (लाक्षेवि) व सदस्य यांच्याशी विचारविनिमय करुन अंतिम करावे व पुढील बैठकीत मांडण्यात यावे.''

ठराव क्र. ३४/६

''ठराव करण्यात येतो की, चिकोत्रा मध्यम प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या कामाअंतर्गत बेगवडे - आरळगुंडी या पर्यायी रस्त्याच्या कामास रु. २८ लक्ष निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्रमांक ३४/७

"ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र. २ मध्ये दर्शविलेल्या १ मोठा व ४ लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३४/८

''ठराव करण्यात येतो की, श्री. प्र. ना. बेहेरे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांच्या, महामंडळाचे कायदे सल्लागार म्हणून दि. १.४.२००३ ते ३१.३.२००४ या कालावधीसाठी रु. ८०००/- प्रतिमाह मानधनावर, मा. अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांच्या मान्यतेने केलेल्या पुनर्नियुक्तीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. ३४/९

''ठराव करण्यात येतो की, उजनी धरणाच्या एकूण नियोजनावर धरणाअंतर्गतच्या अचल साठ्याचा प्रभाव विचारात घेता, १.७.२००३ पासून उजनी धरणाच्या अचल साठ्यातून पाणी सोडण्यात येऊ नये आणि अपवादात्मक परिस्थितीत, पाणी सोडण्याची गरज भासल्यास, राज्य मंत्रीमंडळाच्या पूर्व परवानगीनेच अशी कार्यवाही करण्यात यावी.''

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे



Resolution_dir_meet_34.doc

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

ठराव क्र. ३४/१०

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम क्र.१४/११.१.२००० नुसार निर्माण केलेले वित्त सदस्य हे पद गेले एक वर्ष रिकामे असल्याने, या पदावर वित्त सदस्याची नेमणूक करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

आयत्या वेळचे विषय

ठराव क्र. ३४/११

"ठराव करण्यात येतो की, शासनाच्या **SPV (Special Purpose Vehicle)** द्वारे महामंडळासाठी निधी उभारण्याची कार्यवाही गेले ४ महिने चालू असूनही अत्यंत कमी निधी जमा झाला आहे. त्यामुळे **SPV** मार्फत निधी उभारण्याबरोबरच, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास स्वतंत्रपणे निधी उभारण्याची परवानगी द्यावी असा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे."

ठराव क्र. ३४/१२

"ठराव करण्यात येतो की, चोराखळी साठवण तलाव ता. कळंब, जि. उस्मानाबाद या तलावातून बार्शी तालुक्यातील उकडगांव व इतर गावांना शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी देण्यासाठी ०.४ दलघमी इतक्या पाणीवापराचे परवाने मंजूर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदर मंजुऱ्यासाठी पाण्याची उपलब्धता साठवण तलावाच्या लाभक्षेत्रात ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करुन करण्यात यावी."

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

परिशिष्ट क्र. १

## महामंडळाच्या कार्यक्षेतील कामांसाठी प्राधान्यक्रम

| प्राधान्यक्रम क्र. | प्राधान्य ठरविण्याचे तत्व व त्या गटातील प्रकल्पांची नावे | |
|---|---|---|
| १. | थकीत दायित्वाची अदायगी करणे | |
| २. | कामे पुनश्च सुरु करण्यासाठी खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम निश्चित करणे | |
| १. | वर्ग-अ | प्रगतीच्या पुढच्या टप्प्यात असलेले असे मोठे व मध्यम प्रकल्प की यांमध्ये तुलनात्मक कमी गुंतवणूक करुन लक्षणीय जलसाठा निर्माण होईल, तसेच अशी प्रकल्प कामे की जी प्रकल्पांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करणे अपरिहार्य आहे (उरमोडी, तारळी, सिना कोळेगांव, धोम बलकवडी, निरा देवघर, गुंजवणी, भामा आसखेड हे मोठे प्रकल्प व अशाच प्रकारचे बांधकामाधीन मध्यम प्रकल्प) |
| २. | वर्ग-ब-१ | बांधकामाधीन असलेले व धरणांची कामे पूर्ण झालेले असे प्रकल्प की ज्या प्रकल्पांच्या चालू असलेल्या कालवे व वितरण व्यवस्थेच्या कामामध्ये तुलनात्मक अल्प गुंतवणूक करुन लक्षणीय सिंचन क्षमता निर्माण होऊ शकेल (कुकडी, भीमा, चासकमान, कृष्णा) हे प्रकल्प केंद्रीय अर्थसहाय्यासाठी प्रस्तावित केले आहेत. |
| ३. | वर्ग-क-१ | ज्या उपसा सिंचन योजनांवर आतापर्यंत लक्षणीय गुंतवणूक झाली असून, यापुढे काही गुंतवणूक करुन ज्या उपसा सिंचन योजनांची महत्वाची कामे पूर्ण करता येतील तसेच अवर्षणप्रवण क्षेत्रास सिंचन लाभ मिळेल अशा योजना (ताकारी, म्हैसाळ, टेंभू, जनाई-शिरसाई, पुरंदर, सीना-माढा) |
| ४. | वर्ग-ब-२ | ज्या उपसा सिंचन योजनांवर आतापर्यंत विशेष गुंतवणूक झालेली नाही व त्यामुळे त्या योजनांची कामे काही कालावधीसाठी पुढे ढकलणे शक्य आहे अशा योजना (उदा. जिहे काठापूर, बार्शी, एकरुख, आष्टी, शिरापूर, दहिगांव, वाकुर्डे, कृष्णा टप्पा-२ खालील उपसा सिंचन योजना, सीना मेहेकरी, अनाळा व शिराळा इ.) |
| ५. | वर्ग-क-२ | बांधकामाधीन असलेले व धरणांची कामे पूर्ण झालेले असे प्रकल्प की ज्यांची कालवे व वितरण व्यवस्थेची कामे काही कालावधीसाठी पुढे ढकलणे शक्य आहे (उदा. दूधगंगा, वारणा, भीमा-सीना जोड कालवा) |

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

परिशिष्ट क्र. २

## सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात आलेले प्रकल्प

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव | सुधारित प्रशासकीय मान्यतेची किंमत रु. लक्ष | दरसूची |
|---|---|---|---|
| | अ) मोठे प्रकल्प | | |
| १ | चासकमान पाटबंधारे प्रकल्प ता.खेड जि.पुणे | ३८८१३.३९ | २०००-०१ |
| | ब) लघु प्रकल्प | | |
| १ | ल.पा.तलाव पांगरे ता.जि.सातारा | १००६.४७ | २०००-०१ |
| २ | ल.पा.तलाव करंजगाव ता.चंदगड जि.कोल्हापूर | ७८६.२० | १९९९-२००० |
| ३ | ल.पा.तलाव मेघोली ता.भुदरगड जि.कोल्हापूर | ८४७.५१ | १९९९-२००० |
| ४ | ल.पा.तलाव धुबधुबी ता.द. सोलापूर जि.सोलापूर | २१८८.०३ | १९९९-२००० |

मा. मंत्री, पा (कृखो व कोपाविमं) व अध्यक्ष,
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म., पुणे